## प्रेसनोट दि. ०७.०५.२०२२

**लोकसेवक श्री.विष्णू मारूतीराव कांबळे वय ५८ वर्ष, शिक्षण अधिकारी, माध्यमीक शिक्षण विभाग, जिल्हा परिषद सांगली व लोकसेवक विजयकुमार अशोक सोनवणे वय ४१ वर्ष अधीक्षक, माध्यमीक शिक्षण विभाग, जिल्हा परिषद सांगली यांना १,७०,०००/- रूपये लाच स्विकारले नंतर रंगेहात पकडले सांगली लाच लुचपत प्रतिबंधक विभागाची कारवाई.**

---

तक्रारदार व त्यांचे दोन शिक्षक मित्र यांचे पदवीधर वेतन श्रेणी मान्यता मिळणेबाबत प्रस्ताव मा. शिक्षणाधिकारी सो, माध्यमिक शिक्षण विभाग, जिल्हा परिषद, सांगली यांचेकडे दिला होता. सदरचे काम करून देण्यासाठी शिक्षण अधिकारी कांबळे व अधीक्षक सोनवणे यांनी तक्रारदार व त्यांचे शिक्षक मित्र यांचेकडे प्रत्येकी ६०,०००/- रूपये प्रमाणे लाच मागणी केली असल्याबाबतचा तक्रारी अर्ज तक्रारदार यांनी दि.२६.०४.२०२२ रोजी ॲन्टी करप्शन ब्युरो सांगली पथकास दिला होता.

तक्रारदार यांनी दिलेल्या तक्रारीनुसार दिनांक २६.०४.२०२२, दि.०२.०५.२०२२ व दि.०६.०५.२०२२ रोजी ब्युरोच्या कार्यप्रणालीप्रमाणे पडताळणी केली असता त्यामध्ये शिक्षण अधिकारी कांबळे व अधीक्षक सोनवणे यांनी तक्रारदार व त्यांचे शिक्षक मित्र यांचेकडे प्रत्येकी ६०,०००/- प्रमाणे १,८०,०००/- रूपये लाचेची मागणी करून चर्चेअंती १,७०,०००/- रूपये लाचेची मागणी केली असल्याचे निष्पन्न झाले.

त्यानंतर लोकसेवक कांबळे, शिक्षण अधिकारी व लोकसेवक सोनवणे, अधीक्षक यांचे विरूध्द जिल्हा परिषद कार्यालय सांगली तसेच लोकसेवक कांबळे यांचे राहत्या घराजवळ सापळा लावला असता लोकसेवक विजयकुमार अशोक सोनवणे, अधीक्षक, माध्यमीक शिक्षण विभाग, जिल्हा परिषद सांगली रा. शेंडगे किराणा समोर, अहील्यानगर, कुपवाड सांगली यांनी तक्रारदार यांचेकडे लाचेची मागणी करून १,७०,०००/- रूपये लाच रक्कम स्विकारली तसेच लोकसेवक सोनवणे यांनी सदरची लाच रक्कम लोकसेवक श्री.विष्णू मारूतीराव कांबळे, शिक्षण अधिकारी, माध्यमीक शिक्षण विभाग, जिल्हा परिषद सांगली रा.कल्पतरू संकल्प सोसायटी हॉटेल सिजन फोरचे मागे, ३ रा मजला, फ्लॅट नं १३ विश्रामबाग सांगली यांना दिल्यानंतर लोकसेवक कांबळे व लोकसेवक सोनवणे यांना लोकसेवक कांबळे यांचे राहत्या घरी लाच रक्कमसहीत पकडण्यात आले आहे.

त्या अनुषंगाने लोकसेवक श्री.विष्णू मारूतीराव कांबळे वय ५८ वर्ष, शिक्षण अधिकारी, माध्यमीक शिक्षण विभाग, जिल्हा परिषद सांगली व लोकसेवक विजयकुमार अशोक सोनवणे वय ४१ वर्ष अधीक्षक, माध्यमीक शिक्षण विभाग, जिल्हा परिषद सांगली यांचे विरुध्द विश्रामबाग पोलीस स्टेशन येथे लाचलुचपत प्रतिबंधक अधिनियमाखाली गुन्हा दाखल करण्याची कार्यवाही सुरु आहे.

सदरची कारवाई मा. श्री. राजेश बनसोडे सो पोलीस उप आयुक्त/पोलीस अधीक्षक, श्री. सुरज गुरव सो, अपर पोलीस उप आयुक्त/अपर पोलीस अधीक्षक लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे यांचे मार्गदर्शनाखाली श्री. सुजय घाटगे, पोलीस उप अधीक्षक, श्री.विनायक भिलारे पोलीस निरीक्षक, श्री.दत्तात्रय पुजारी पोलीस निरीक्षक, पोलीस अंमलदार अविनाश सागर, प्रितम चौगुले, धनंजय खाडे, सलिम मकानदार, सिमा माने, संजय संकपाळ, सजय कलगुटगी, रविंद्र धुमाळ, राधिका माने, भास्कर भोरे, यांनी केली आहे.

नागरिकांना आवाहन करण्यात येते की, लाच मागणी संबंधाने तक्रारी असल्यास पोलीस उप अधिक्षक, लाच लुचपत प्रतिबंधक, विभाग, बदाम चौक, सांगली. येथे अथवा कार्यालयीन दुरध्वनी क्रमांक ०२३३/२३७३०९५ वर तसेच हेल्प लाईन क्रमांक १०६४ वर तसेच व्हॉट्स ॲप नंबर ७८७५३३३३३३ व मोबाईल नंबर ८९७५६५१२६२ तसेच खालील संकेतस्थळावर संपर्क साधावा.

संपर्क :-

१) मोबाईल ॲप - www.acbmaharashtra.net

२) फेसबुक पेज - www.facebook.com-maharashtraACB

३) वेबसाईट – www.acbmaharashtra.gov.in

पोलीस उप अधीक्षक लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, सांगली

सत्यमेव जयते

(सुजय घाटगे)
**पोलीस उप अधीक्षक**
**ॲन्टी करप्शन ब्युरो, सांगली.**

Scanned with Oken Scanner